# राष्ट्रीय आरोग्य अभियान कोल्हापूर

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी कोल्हापूर

रजि. नं. महाराष्ट्र/२१२३२/कोल्हापूर दि. १८ ऑगष्ट २००५

पत्ताः आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नागाळापार्क कोल्हापूर. फोननं. : ०२३१ – २६५६६१७, २६५२३२७

ई मेलः nhmkolhapur2023@gmail.com


आरोग्य सेवा

जा.क्र.जिप/आरोग्य/रा.आ.अ/सेवाजेष्ठता/आक्षेपअर्ज/ २६२ /२४

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर

दि.१३ /०८/२०२४

## सेवा जेष्ठता यादीबाबत सूचना

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत सर्व कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांची दिनांक ०१/०१/२०२४ रोजीची (दिनांक ३१/१२/२०२३ रोजी किंवा त्यापुर्वी रुजू झालेल्या) सेवाजेष्ठता यादी शासन अधिसुचना दिनांक २१/०६/२०२१ अन्वये तसेच शासन पत्र क्र. एनएचएम-११२४/प्र.क्र.२४५/आरोग्य-७. दिनांक ३०/०७/२०२४ अन्वये तयार करण्याबाबत व राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक राआसो/आस्था/सेवाजेष्ठता यादी/४३१४४-४८३/२०२४. दिनांक ३१/०७/२०२४ अन्वये सुचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार जिल्हयातील अभियानांतर्गत कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचारी यांची संवर्गनिहाय तात्पुरती सेवाजेष्ठता यादी तयार करण्यात आलेली असून यासोबत प्रसिद्ध करण्यात येत आहे. तसेच सदर यादी ही http://www.zpkolhapur.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सदर यादीमध्ये आपल्या नावासमोर नोंदविलेल्या माहितीबाबत काही हरकती असल्यास त्यांनी लेखी स्वरुपात योग्य त्या पुराव्यासह दिनांक **१४/०८/२०२४ ते २२/०८/२०२४** या कालावधीत सकाळी १०.०० ते सायं. ६.०० वा. पर्यंत (फक्त कार्यालयीन कामकाजाचे दिवशी) **राष्ट्रीय आरोग्य अभियान कक्ष, २ मजला , आरोग्य विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर** या ठिकाणी **समक्ष** आक्षेप सादर करावेत. सदर आक्षेप यासोबत देण्यात आलेल्या विहित नमुन्यातील अर्जासह पुराव्या संबधीत सर्व आवश्यक दस्ताऐवज सादर करावेत. तसेच पोस्टाने (डाकने) अथवा अन्य मार्गाने सादर केलेले आक्षेप स्विकारले जाणार नाहीत, याची सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी नोंद घ्यावी. तसेच नजरजुकीने एखादया कर्मचारी व अधिकारी (दि.०१-०१-२०२४ पुर्वी हजर झाले असल्यास ) यांचे नाव यादी मध्ये नसल्यास संबंधीतानी हरकत नोंदवावी.

विहित कालावधीत योग्य त्या पुराव्यासह आक्षेप नोंदविण्याची जबाबदारी ही संबंधित अधिकारी व कर्मचारी यांची असून याकरीता या कार्यालयाकडून वयैक्तिक संपर्क अथवा इतर कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. नमुद कालावधीनंतर आलेले कोणतेही आक्षेप स्विकारल्या जाणार नाही. प्राप्त आक्षेप विचारात घेवून अंतिम सेवाजेष्ठता यादी व पुढील सुचना जिल्हा परिषद कोल्हापूर संकेतस्थळ http://www.zpkolhapur.gov.in/ वर प्रसिद्ध करण्यात येईल. यासाठी अधिकारी व कर्मचारी यांनी वेळोवेळी सदर संकेतस्थळाला भेट देत राहावे.

13/08

सदस्य-सचिव

जि.ए.आ. व कु.क. सोसायटी तथा

जिल्हा आरोग्य अधिकारी

जिल्हा परिषद काल्हापूर

प्रत माहितीस्तव सविनय सादर

१) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर

२) मा. उपसंचालक आरोग्य, सेवा कोल्हापूर मंडळ कोल्हापूर

३) मा. जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय कोल्हापूर

४) मा. तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती कोल्हापूर

# आक्षेप अर्ज

दिनांक : /०८ /२०२४

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, कोल्हापूर

विषय:- रा.आ.अ. अंतर्गत कंत्राटी........................................ पदाच्या तात्पूरती सेवाजेष्ठता यादीमध्ये नोंदविलेल्या माहिती संबंधित आक्षेप सादर करित असल्याबाबत.

सेवा जेष्ठता यादी क्र. ............ संपुर्ण नाव :-.......................................................................

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस सविनय विनंती करतो /करते की, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत प्रसिद्ध करण्यात आलेल्या सेवाजेष्ठता यादीमध्ये माझ्या खालीलप्रमाणे त्रुटी आहेत.

| अ.क्र. | यादीमध्ये नमुद माहिती | त्याऐवजी करावयाची दुरुस्ती |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

माझेकडे सदर बाबीचे / माहितीचे वैध दस्ताऐवज असून मी यासोबत पुरावा म्हणून जोडत आहे. तरी माझेद्वारा सादर केलेल्या आक्षेपाबाबत योग्य ते बदल घेण्यात यावे ही विनंती.

सहपत्र :- १)..................................... २).....................................
३)..................................... ४).....................................
५)..................................... ६) .....................................

(अधिकारी / कर्मचारी स्वाक्षरी)
पुर्ण नांव ......................................................
पदनाम.........................................................
मुख्यालय ................................. ता. .............
मोबाईल क्र...................................................